# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.11.2025** **वारः सोमवार**

---

देशाची पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवण्यात राज्यातील महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात.

पुण्यात आयोजित 67व्या आकाशवाणी संगीत संमेलनाला रासिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

आणि

राज्याच्या विविध भागात थंडीची चाहूल; जळगावमध्ये पारा 10 अंशांवर

**इनोव्हेशन**

भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स राज्यातील असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत आणि ही अभिमानाची बाब असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईततील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या ‘इनोव्हेशन महाकुंभ २०२५’ चे उद्घाटन कार्यक्रम फडणवीस

यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते. महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणारे भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात राज्यातील महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेलअसं सांगताना नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी असेलअसा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा या कार्यक्रमाला उपस्थित होते.

बिहारप्रचार

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचार काल संपला. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांच्यासह संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीशकुमार आणि राजद नेते तेजस्वी यादव यांनी अनेक प्रचारसभा घेतल्या. दुसऱ्या टप्प्यात उद्या मतदान होणार असून 14 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. दरम्यान पहिल्या टप्प्यात 65 पूर्णांक 8 दशांश मतदान झालं आहे.

**निवडणूक**

राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायलाआजपासून सुरुवात होणार आहे. १७ नोव्हेंबरपर्यंत हे अर्ज भरता येणार आहेत. तर १८ नोव्हेंबर रोजीअर्जांची छाननी होणारआहे. अर्ज मागे घ्यायची शेवटी मुदत २१ नोव्हेंबर ही असून उमेदवारांची अंतिम यादी २६ नोव्हेंबर रोजी जाहीर

केलीजाणार आहे. या निवडणुकीत एकंदर १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार, ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८अध्यक्षांची निवड करतील. मतदान २ डिसेंबर रोजी, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे.

संगीतसंमेलन 67व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं उद्घाटन काल पुण्यात ज्येष्ठ गायक पंडित उल्हास कशाळकर यांच्या हस्ते झालं. केंद्र सरकारचं सांस्कृतिक कार्य मंत्रालय आणि प्रसार भारती यांच्या वतीनं याचं आयोजन करण्यात आलं होतं. या संमेलनात विदुषी ज्योती हेगडे यांचं रुद्रवीणा वादन, पंडित मोहन श्याम शर्मा यांचं पखवाज वादन तसंच विजयकुमार गायकवाड आणि सहकाऱ्यानी सादर केलेल्या मराठी लोकसंगीताच्या सादरीकरणाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**<u>इंट्रो-जन्मशताब्दी</u>**

सुनीताबाई देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रत्नागिरीत आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या विशेष उपक्रमाचा समारोप काल झाला. काव्यवाचन, अभिवाचन, त्याच्या स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, सामाजिक संस्थेला पुरस्कार असे विविध कार्यक्रम यात राबवण्यात आले. या संदर्भात ऐकुयात माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.... . . .

**<u>स्क्रिप्ट</u>**:

लेखन, अभिनय, नृत्य आदी कला स्वतःकडे असूनही, सुनीताबाई आयुष्यभर वावरल्या त्या पु. ल. देशपांडे यांच्या गृहिणी-सखी-सचिव म्हणूनच. 'आहे मनोहर तरी' या पुस्तकातून सुनीताबाईंनी जी एक धिटाई दाखवली आणि दिली, त्यानंतर पुष्कळ लेखक आणि कलावंतांच्या पत्नींची अशी आत्मपर लेखनं प्रसिद्ध झाली.

साधनशुचिता आणि कलेवरची अंतिम निष्ठा या दोन मूल्यांच्या साह्याने त्यांनी अतिशय निरलसपणे गृहिणीपण आणि सचिवपण पार पाडलं, असं निरीक्षण प्रसिद्ध लेखिका मंगला गोडबोले यांनी नोंदवलं. निर्मिक हा कलाक्षेत्राचा आधार असून, त्यांच्या हक्कांची पायमल्ली करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असं सांगत त्यांनी लेखक, कलावंतांच्या स्वामित्वहक्कांसाठी महत्त्वपूर्ण लढा दिला. किती तरी लेखकांची जन्मशताब्दी होते; मात्र लेखकपत्नीची जन्मशताब्दी होण्याचा योग दुर्मीळ आहे, असे उद्गार गोडबोले यांनी काढले. 'आहे मनोहर तरी'ची तात्त्विक समीक्षा करण्याचे प्रयत्न या जन्मशताब्दी वर्षात तरी अभ्यासक आणि विद्यार्थ्यांकडून व्हायला हवेत, अशी अपेक्षा लेखक प्रवीण बांदेकर यांनी व्यक्त केली. एकंदरीतच, हा उपक्रम सुनीताबाई आणि पुलंच्या पैलूंची चर्चा करणारा, स्मृती जागवणारा आणि त्या निमित्ताने साहित्य चळवळीला नवी प्रेरणा देणारा ठरला.

आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त ‘ललित पौर्णिमा’ हा सोहळा शनिवारी रात्रभर मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याबद्दल आकाशवणीशी बोलताना ललित कला केंद्राचे प्रमुख डॉक्टर प्रवीण भोळे म्हणाले –

**<u>बाईट – भोळे – 44</u>**

**इंट्रो-सुवर्णपदक**

बीड जिल्हयातील आष्टी तालुका हा नेहमी दुष्काळी भाग. पण याच तालुक्यातील पाटसरा गावातील सनी सुभाष फुलमाळी या युवकाने बहरीनमधल्या वहहुँनमध्ये इथं झालेल्या आशियाई युवा कुस्ती स्पर्धेत 60 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. प्रतिकूल परिस्थितीला चितपट करून अल्पवयातच त्याने देशाचे नाव जागतिक पातळीवर उंचावलं. झोपडीत वाढलेला सनी आपल्या पाटसरा ते सुवर्णपदकाच्या प्रवासाबाबत आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाला. . . . . .

**पुरस्कार**

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड अर्थात महा मेट्रोला हरियाणामधील  गुरुग्राम इथं झालेल्या १८व्या अर्बन मोबिलिटी इंडिया या राष्ट्रीय परिषदेत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट प्रदर्शकाचा पुरस्कार मिळाला आहे. गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्री मनोहर लाल यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महा मेट्रोनं केलेल्या उत्कृष्ट सादरीकरणाची, नाविन्यपूर्ण प्रदर्शनाची आणि माहितीच्या प्रभावी प्रसारणाची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**पुरस्कार**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीला वर्ल्ड इनोव्हेशन अँड चेंज मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्यावतीने सामाजिक उत्तरदायित्व आणि प्रभावी जनसंपर्क क्षेत्रातील

सर्वोत्कृष्ट मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी इटलीमधल्या रोम इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत या पुरस्काराचं वितरण होणार आहे. महापारेषणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी यशाचे श्रेय जनसंपर्क विभाग आणि त्यांच्या सांघिक कामगिरीला दिलं असून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जनसंपर्क विभाग नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<u>अटक</u>**

आय एस आय एस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याच्या संशयावरून, गुजरात मधल्या दहशतवाद विरोधी पथकानं गांधीनगरमध्ये अदलाज इथून काल ३ जणांना अटक केली असून त्यांच्याकडून शस्त्र जप्त केली. ते देशाच्या विविध भागात हल्ला करण्याचा कट रचत होते. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

**<u>अपघात</u>**

नंदुरबारमध्ये अक्कलकुवा तालुक्यातल्या देवगुई घाटात, शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळूनदोन विद्यार्थी ठार झाले, तर ५०पेक्षा जास्त विद्यार्थी जखमी झाले आहेत. दिवाळीच्या सुट्टीसाठी गावी गेलेले आदिवासीसमुदायाचे विद्यार्थी या बसमधून आश्रमशाळेत परतत होते. मात्र चालकाचं नियंत्रण सुटल्यानं बस खोल दरीत कोसळली. जखमी विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असून त्यापैकी २ ते ३ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याचंआमच्या वार्ताहरानं म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या विविध भागांमध्ये थंडीची चाहूल लागली आहे. जळगावमध्ये तापमानाचा पारा 10 अंशांवर आला होता, तर नाशिकमध्येही 12 ते 13 अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**